प्रेसनोट दिनांक १३/०६/२०१९

## डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर

## हरवलेला मोबाईल परत दिल्याने मुलाने मानले पोलीसांचे आभार

दिनांक १२/०६/२०१९ रोजी श्री कौटकर, पोशि ३६३६ हे दिवसपाळी कर्तव्य संपवुन २१/३० वा. राहते घरी जात असतांना शेलारमामा चौक रस्त्यावर एका मुलाने त्यांना थांबविले. मुलांनी त्यांच्याकडील टॅब दाखवुन सांगितले की हा मला सापडला आहे तो कोणाचा आहे मला माहीत नाही आपण हा पोलीस स्टेशनला जमा करुन घ्या असे सांगितल्याने त्यास नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव संतोष दशरथ काळे, रा. खेड, असा सांगितला. श्री कौटकर यांनी सदरचा सॅमसंग कंपनीचा टॅब पोलीस स्टेशन येथे आणला. टॅब वरील मिसकॉल नंबर वरती कॉल करुन टॅब मालकाची विचारपुस केली. सदरचा टॅब श्री भरत ज्ञानेश्वर आवारे, वय २७ वर्षे, रा. पाडोली, ता. पैठण, जि. औरंगाबाद सध्या रा. कुमठेकर चौक सदाशिव पेठ पुणे मो. ९८६०८७६४६४ असे सांगितले त्यास डेक्कन पोलीस स्टेशन येथे बोलावुन घेवुन खात्री करुन मोबाईल टॅब ताब्यात दिला. हरवलेला मोबाईल टॅब परत भेटल्याने श्री भरत ज्ञानेश्वर आवारे यांनी श्री कौटकर पोशि ३६३६ यांचे आभार मानले.

